जिल्हा परिषदांच्या निर्दिष्ट उत्पन्नाच्या १५ टक्के रक्कम मागास वर्गीयांच्या उन्नतीसाठी खर्च करणे.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
निर्णय क्रमांक झीपीडब्ल्यू-१०७६/प्र ५८६/बावीस,
मंत्रालय, मुंबई - ३२. दिनांक :- ६ जानेवारी, १९७७

निर्णय :- जिल्हा परिषदांनी आपल्या निर्दिष्ट उत्पन्नाच्या निदान १५ टक्के रक्कम अनुसूचित जाती व जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती नवबौध्दांच्या उन्नतीसाठी खर्च कराव्यात अशा सूचना शासनाने वेळोवेळी विशेषतः दिनांक ६-९-१९७३, १३-६-७४, व १६-९-७५ च्या अनुक्रमे क्रमांक : एलएफ्सी-१०७२/३२२९८/डी, चार क्रमांक : एलएफ्सी-१०७४/१८४७५/डी चार व क्रमांक : एलएफ्सी-१०७५/३४०३६/एकवीस च्या आदेशान्वये दिल्या आहेत. तथापि या ना त्या कारणाने ब-याच जिल्हा परिषदांकडून त्यांची अपेक्षित कार्यवाही होऊ शकली नाही. अनुसूचित जाती व जमाती भटक्या जमाती, विमुक्त जाती व नवबौध्दांच्या उन्नतीच्या योजना आखता याव्यात व त्यांची योग्य ती कार्यवाही व्हावी या हेतूने शासन खालील प्रमाणे सूचना देते. या सूचनांद्वारे पूर्वीचे दिनांक ६-९-७३, १३-६-७४ व १६-९-७५ चे वर नमूद केलेले आदेश रद्द केले आहेत.

(१) प्रत्येक जिल्हा परिषदेने आपल्या वार्षिक अंदाजपत्रकात खाली दाखविलेल्या उत्पन्नाच्या निदान १५ टक्के इतकी रक्कम वर निर्देशिलेल्या मागास वर्गीय जनतेच्या उन्नतीसाठी खर्च करावी.

एक) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियमांच्या कलम १५७ खाली जिल्हा परिषदेने बसविलेले कर,

दोन) सदर अधिनियमांच्या कलम १५५(१) खाली जमीन महसुलावरील उपकरांत होणारी वाढ,

तीन) अधिनियमांच्या कलम १५५(२) अन्वये पंचायत समित्यांनी सुचविलेली जमीन महसुलावरील उपकरांत होणारी वाढ,

चार) अधिनियमांच्या कलम १४४, १५१ व १५२ कलमाखाली बसविलेला दर रूपयामागे २० पैसे जमीन महसूलावरील विशाल उपकर,

पांच) उपकर सापेक्ष अनुदानाचे उत्पन्न,

सहा) शासनाने हस्तांतरीत केलेल्या योजना व कामांसाठी मिळणा-या अनुदानाचे उत्पन्न.

(२) या आदेशासह असलेल्या नमुन्यात मुख्य कार्यकारी अधिका-यांनी दरवर्षी एक विवरण तयार करावे. या विवरणाच्या प्रती ग्राम विकास विभाग व समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभागास व समाज कल्याण संचालकांस माहितीसाठी पाठवाव्यात.

(३) या अनुसूचित जाती व जमाती भटक्या जमाती, विमुक्त जाती व नवबौध्दांच्या विकासार्थ राखून ठेवायची १५ टक्के रक्कम बरोबर निश्चित करावी व अशा त-हेने निश्चित केलेली रक्कम सदर योजनांवर योग्य प्रकारे खर्च करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिका-यांवर राहील. यासाठी वार्षिक अंदाजपत्रकांत प्रत्येक संबंधित लेखाशिर्षाखाली मागासवर्गीयांच्या कामासाठी असलेली रक्कम वेगळी दाखवावी.

OFFICE OF THE COLLECTOR
RATNAGIRI
Date 13 JAN 1977
Branch

====२

(४) वर सांगितल्याप्रमाणे निदान १५ टक्के रक्कम प्रत्यक्षांत खर्च होते की नाही ते पाहण्याचे जिल्हा परिषदेचे कर्तव्य राहील. परंतु जेथें अशा मागास वर्गीयांचे प्रमाण अधिक असेल तेथे ही तरतुदीची टक्केवारी वाढविण्यास कोणतीच हरकत नाही. ज्या पंचायत समित्यांनी अधिनियमांच्या कलम १५५(२) खाली उपकरात वाढ सुचविली असेल त्या पंचायत समित्यांनीही अशा उत्पन्नातून अशाच त-हेने खर्च करावा.

(५) जर एखाद्या वर्षी १५ टक्के रक्कम अशा योजनांवर खर्च होऊ शकली नाही तर उर्वरित तरतुद पुढील वर्षीच्या तरतुदीत मिळवावी. अशा त-हेने पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकांत वाढीव तरतुद त्या (२ -या) वर्षी खर्च करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेने घ्यावी. १९७७-७८ चे अंदाजपत्रक तयार करतांना मुख्य कार्यकारी अधिका-यांनी या गोष्टीकडे विशेष लक्ष द्यावे. १९७२ साली ज्या वेळी प्रथम या बाबतचे आदेश दिले तेव्हांपासून मागास वर्गीयांवरील खर्चात जी तूट येत आली असेल ती सर्व जमेस धरुन येत्या वर्षासाठी आपल्या घ्यावयाच्या कार्यक्रमाबाबत सूचना शासनास सादर कराव्यात. १९७६-७७ च्या ८ महिन्याच्या सुधारित अंदाजपत्रकातही चालू वर्षीचा या बाबतीत खर्च व मागील तूट विचारात घेऊन जरूर ती शक्य तेवढी पूरक तरतुद करण्याची व त्याप्रमाणे खर्च करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिका-यांनी घ्यावी.

(६) मागास वर्गीयासाठी अशा त-हेने निर्दिष्ट रकमेतून घ्यावयाच्या कामाची रूपरेषा मुख्य कार्यकारी अधिका-यांनी आखावी व त्यांस अधिनियम व नियमानुसार जिल्हा परिषद इत्यादींची प्रशासकीय मान्यता घ्यावी. अशा त-हेने मान्यता प्राप्त कामाची रूपरेषा समाज कल्याण संचालकांकडे तांत्रिक मान्यतेसाठी पाठवावी. प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त कार्यक्रमाची तत्परतेने कार्यवाही करावी. कोणत्याही प्रकारचा कालापव्यय टाळून जरूर त्या पूर्वतयारीस मुख्य कार्यकारी अधिका-यांनी लागावे हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

(७) जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित केलेल्या कामांसाठी शासनाचे संबंधित प्रशासकीय विभाग जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने (पर्पजिव ग्रँट) देतात. त्या सचिवालयीन विभागांनी अशा योजनांच्या निदान १५ टक्के खर्च, मागास वर्गीयासाठी होऊ शकेल अशा रितीने योजनामध्ये फेरफार करावेत. आपल्याकडे हस्तांतरित झालेल्या योजनांची अंमलबजावणी करतांना मुख्य कार्यकारी अधिका-यांनीही ही गोष्ट लक्षांत घ्यावी व संबंधित सचिवालयीन विभागांना जरूर ते बदल सुचवावेत.

(८) १५ टक्के वाटा बरोबर निर्धारित करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिका-यांनी योजनांची छाननी करुन विभागणी क्षम तरतुदी कोणत्या व विभागता न येण्या जोग्या तरतुदी कोणत्या ते ठरवावे. जरूर तेथे योजनामध्ये सुधारणा करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिका-यांनी संबंधित विभागांशी संपर्क साधावा.

(९) विभागीय आयुक्तांनी व मुख्य कार्यकारी अधिका-यांनी या कामी योग्य प्रगती होते की नाही ते पहाण्यासाठी त्रैमासिक आढावा घ्यावा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपला आढाव्याच्या अहवाल आयुक्तामार्फत शासनास पाठवावा.

(१०) समाज कल्याण या लेखा शीर्षाखाली अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीशिवाय इतरही प्रधान लेखा शीर्षाखालील तरतुदीतून निर्दिष्ट मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी कांही तरतुदी राखून ठेवाव्यात व अशा सर्व लेखाशीर्षाखाली केलेली वेगळी तरतूद अर्थसंकल्पात

====३

31 ~~165~~ ~~183~~ 35 ~~(81)~~ (39) Copy

वेगळ्या पानावर दाखवावी. म्हणजे शासकीय धोरणाप्रमाणे मागासवर्गीयासाठी भागवार तरतुदी अर्थसंकल्पात दृष्टिक्षेपात उपलब्ध असावी.

(११) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहितेत दिलेल्या प्रधान व उप लेखाशीर्षाच्या आधारे नमुन्यादाखल कांही लेखा शीर्षाखाली मागासवर्गीयांच्या कल्याणार्थ काम योजना दाखविता येतील ते पुढे दाखविले आहे.

''ब'' शिक्षण :-

(एक) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना (अनुसूचित जाती जमाती इ.) एसएससी पूर्व शिक्षणासाठी शिष्यवृत्ती शालान्त परीक्षेनंतरच्या शिक्षणासाठी केंद्र शासनाच्या योजनेखाली अशा शिष्यवृत्ती देता येतील,

(दोन) मागास वर्गीयासाठी शैक्षणिक सवलती,

(तीन) आश्रम शाळांचा विकास,

(चार) प्राथमिक शिक्षणाचा नित्याचा कार्यक्रम.

'क' सार्वजनिक बांधकाम :-

संकीर्ण - रस्त्याव्यतिरिक्त दळणवळणाची इतर साधने (त्यांत झोपडयांकडे जाण्यासाठी जोडरस्त्याचा समावेश करता येईल)

ड - स्वच्छता व आरोग्य :-

संकीर्ण - रस्त्याव्यतिरिक्त दळणवळणाची इतर साधने (त्यांत झोपडयांकडे जाण्यासाठी जोड-रस्त्याचा समावेश करता येईल)

ड - स्वच्छता व आरोग्य :-

(एक) मागासवर्गासाठी स्थितीसुधार विषयक उपाय योजना (यांत जलनिस्सारणाची कामे घेता येतील)

(ड) (दोन) मागास वर्गीयांच्या वस्तीजवळ वैद्यकीय व आरोग्य केंद्रे/पथके उघडणे.

ई - आरोग्य अभियांत्रिकी :-

ग्रामीण जलनिस्सारण

कुपयासाठी व पिण्यासाठी पाणी

(१२) प्राथमिक शिक्षण आरोग्य पाणी पुरवठा जोडरस्ते, ग्रामीण विद्युतीकरण, घरबांधणी, पूरक पोषण किमान गरजा योजना व २० कलमी कार्यक्रमाशी सुसंगत मागास वर्गीयांसाठी असलेली कामे हाती घेणे आवश्यक आहे. तसेच शेती व पशुधन विकासाच्या क्षेत्रात जिल्हा परिषदांनी जे हाती घेतलेल्या कार्यक्रमासाठी याच धर्तीवर तरतुद करणे आवश्यक आहे.

(१३) अनुसूचित जाती व जमाती, भटक्या जमाती विमुक्त जाती व नवबौध्दांच्या वस्तीच्या प्रमाणांत जिल्हा परिषदांनी अशा कार्यक्रमासाठी खर्च करावा. ही टक्केवारी निदान १५ टक्के असावी व जेथे अशा जनतेची वस्ती अधिक प्रमाणांत असेल तेथे तरतुदीचे प्रमाण वाढवावे.

(१४) शासनाने दिनांक २-१२-७२ च्या निर्णयांत दिलेल्या आदेशांचे व सांप्रतच्या निर्णयातील निर्दीष्ट मागास वर्गीयासाठी निदान १५ टक्के खर्च करण्याबाबतच्या जिल्हा परिषदांवरील

====४

बंधनाचे पालन होण्याबाबत समाज कल्याण संचालकांनी दक्ष असावे. प्रत्येक जिल्हा परिषदेकडून या आदेशाचे पालन होईल याची त्यांनी खबरदारी घ्यावी व त्यासाठी त्यांनी मागविलेली माहिती जिल्हा परिषदांनी तत्परतेने पुरवावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(भा. स. गुरलवार)
कक्षाधिकारी, महाराष्ट्र शासन.